Rotary

# SPARK

Rotary Club of Poona Midtown

CREATE HOPE in the WORLD

**Rtn. Minal Avachat**
President
9823081158

**Rtn. Smita Shah**
Secretary
9049860647

**Ann Manisha Kulkarni**
Editor
9422307038

Dist 3131 | Zone 05 | CC 15537
Year : 54 Issue No.: 30 Wed, 12 March 2024
For Private Circulation Only

We meet at Sevasadan School, Erandavane, at 7.30pm every Wednesday

**|| जलमेव जीवनम् ||**

## आजची सभा



सुनंदन लेले ब्लड ग्रुप C+. हा ब्लड ग्रुप ऐकला नव्हता ना? पण आपल्यापैकी बऱ्याच जणांचा व हिंदुस्तानातील अनेकांचा ब्लड ग्रुप हा आहे. C+ म्हणजे क्रिकेट वरील प्रेम. सुनंदन लेले हे त्यातील अग्रगण्य! कोणत्याही क्रिकेट सामन्यापूर्वी, मग तो देशात असो किंवा परदेशात, प्रत्यक्ष मैदानावरून तेथील हवामान, खेळपट्टीचे स्वरूप अपेक्षित खेळ कसा असेल यासंबंधी सामन्यापूर्वी सखोल माहिती देणे व सामन्यानंतर खेळाचे व खेळाडूंचा पराक्रम किंवा अपयश याचे विश्लेषण करणारे तज्ञ म्हणून सुनंदन लेले गेली तीस वर्षे ओळखले जातात.

या क्षेत्रातील स्वतंत्र पत्रकार म्हणून कार्यास सुरूवात करण्यापूर्वी ते स्वतः एक उत्तम क्रिकेटपटू होते. १९ वर्षांखालील खेळाडूंचे संघनायक, २२ वर्षांखालील संघात समावेश व पुणे विद्यापीठाकडून ५ वर्षे क्रिकेट खेळले आहेत. आतापर्यंत ते क्रिकेट खेळणाऱ्या सर्व देशात गेले आहेत. सुमारे २०० कसोटी सामने व ३५० पेक्षा जास्त एक दिवसाचे सामने व अनेक T20 सामन्यांचे विश्लेषण त्यांनी केले आहे. या दरम्यान सचिन तेंडुलकरच्या १०० पैकी ७५ शतकांचा खेळ पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे. T20 खेळाच्या पुरूषांच्या वर्ल्ड कपच्या प्रत्येक फायनल मॅचचे विश्लेषण त्यांनी केले आहे. याशिवाय २००३, २००७, २०११, २०१५ व २०१९ या वर्षातील पुरूषांचे एक दिवसाचे वर्ल्ड कप सामन्यांचे विश्लेषण त्यांनी केले आहे. Women Scriczone या स्त्रियांच्या क्रिकेटसाठीच्या Online platform शी ते संबंधित आहेत.

B.com, MPM असे त्यांचे शिक्षण तीन मराठी पुस्तकांचे ते लेखक आहेत. सध्या सकाळ दैनिक व Women Scriczone साठी ते लेखन करतात. समाजकार्याची आवड असल्याने ते Creative CSR या माध्यमातून चांगले प्रकल्प राबवितात. राहुल द्रविड यांच्याबरोबर बाबा आमटे यांचे आनंदवन, सचिन तेंडुलकर बरोबर या संस्थेसाठी व विराट कोहली बरोबर एका वृद्धाश्रमास भेट असे काही संस्मरणीय उपक्रम त्यांनी केले आहेत. त्यांच्याबरोबर गप्पा हा आपल्या सर्वांसाठीच एक अविस्मरणीय अनुभव ठरेल.

**– डॉ. धनंजय केसकर**

## जीवेत् शरदः शतम्

**०६ मार्च :** ॲन सारंगा तांबे

**११ मार्च :** ॲन आरती डेंगरे

## आगामी कार्यक्रम

**20th March : AG visit**

**27th March : Kalakar Katta**

## प्रोजेक्ट रिपोर्ट



आपल्या क्लबने नेहमीप्रमाणे पोलिओ डोस शिबिरामध्ये भाग घेतला. भवानी पेठ येथील मेडिकल सेंटर मध्ये तीन मार्च रोजी साडेनऊ ते बारा या वेळेत पोलिओचे डोस देण्यात आले. त्यावेळी रो. नितीन गद्रे, रो. भालचंद्र दरेकर, रो अमरेश मुसळे, रो. विवेक बुटाला, पीपी पराग सुरा, रो. सुरज पाषाणकर, रो. सच्चिदानंद रानडे, अण्णा विघ्नहर अवचट उपस्थित होते. बूथवर काम करणाऱ्यांना ४५ फूड पॅकेटस आपल्या क्लबतर्फे देण्यात आली.

## Unveiling the Man Behind the Bat: Sunandan Lele

In the wacky world of cricket, where googlies and yorkers reign supreme, there exists a man whose knowledge of the game rivals even the most seasoned commentators. He is none other than Sunandan Lele-the cricket guru with a twist of lemon! Now, you might be wondering, who is this guy and why should I care? Well, buckle up, folks, because Sunandan Lele is not your average cricket enthusiast. He's the bumblebee of the cricketing world, except instead of casting spells, he's dropping knowledge bombs faster than a Chris Gayle six! Rumor has it that Sunandan's love affair with cricket started when he was just a wee lad, swinging his plastic bat in the backyard. Legend says he once hit a ball so hard, it traveled all the way to the neighbor's house and knocked over Mrs. Patel's prized gardener! Talk about a power hitter! But Sunandan is more than just a cricket fanatic; he's a walking encyclopedia of cricket trivia. Need to know who scored the most ducks in a single season? Ask Sunandan. Curious about the history of cricket balls? Sunandan's got you covered. Heck, he probably even knows what brand of tea the umpires prefer during tea breaks! And let's not forget Sunandan's unique sense of humor. The man can turn a mundane cricket stat into a laugh-out-loud joke faster than you can say "Sachin Tendulkar." With Sunandan around, even rain delays feel like stand-up comedy shows! So, dear friends, we are fortunate enough to meet him in person. Whether you're a die-hard cricket fan or just someone who enjoys a good laugh, this is one evening we won't forget in a life time. Who knows, we might have even learnt a thing or two about cricket, while getting a good chuckle out of it!

**- Rtn. Sameer Mohire**

## मागील सभा

### २८ फेब्रुवारी २०२४ 'स्व' बद्दल माहिती : डॉ. हिमांशु वझे

राष्ट्रगीताने सुरुवात झाल्यावर प्रमुख पाहुण्यांचा थोडक्यात परिचय पी.पी. सुहास रायकर यांनी करून दिला.

सभेचे प्रमुख पाहुणे डॉ. हिमांशु वझे यांनी 'स्व'चा शोध कसा घ्यावा या बद्दलचे विवेचन केले. स्वस्थ मनाची सुरुवात स्वस्थ देहापासून होत. हे सांगताना त्यांनी जीवनात व्यायामाचे महत्त्व विशद केले. आपल्या दैनंदिन जीवनात किमान एक तास तरी प्रत्येकाने नियमित व्यायाम करावा असे आवाहन त्यांनी केले. Chronological Age, Biological age & Physiological age या संकल्पना त्यांनी उदाहरणं देऊन स्पष्ट केल्या. ज्ञानाची विस्तृत व्याख्या सांगत असतानाच आयुर्वेद आणि अध्यात्म ह्यांची सांगड उकल करून सांगितली. नित्य अभ्यासानेच ध्यानधारणा शक्य होते व अध्यात्मिक प्रगती होते असे डॉक्टरांनी सांगितले.

प्रेक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉक्टरांनी मुद्देसूद उत्तरे दिली.

आपले अण्णा विघ्नहर यांनी प्रमुख पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. प्रे. मीनल ताई नी त्यांचा भेटवस्तू देऊन सन्मान केला.

**– ॲन सीमा म्हसकर**

### मागील सभा – २ मार्च २०२४

सचिन, वृषाली, शर्मिला आणि मोहन देशपांडे परिवार यांनी सर्व आजी माजी रोटेरिअन्स आणि ॲन्स यांना आग्रहाने आमंत्रित करून छान अशी dinner party, Harvest club येथे आयोजित केली होती.

आपल्या रोजच्या दगदगी मधून आम्हा सर्वांना एक आवश्यक असा break त्यांच्यामुळे अनुभवता आला. गप्पांच्या छान मैफीली जमलेल्या दिसल्या. प्रत्येकाकडे जाऊन काय हवे नको याची सारखी काळजी देशपांडे परिवारा कडून घेतली गेली. त्यांच्या मुळे बऱ्याच जुन्या सदस्यांची गाठ भेट झाली. आम्हा सर्वांना एक रम्य संध्याकाळ अनुभवता आली. यामध्ये आमची बडदास्त ठेवण्यात, देशपांडे परिवाराची मात्र खूप धावपळ झाली. सर्वांनी चविष्ट भोजनाचा आस्वाद घेतला. मैत्रीचे धागे मजबूत करत आणि छान आठवणींचा ठेवा घेऊन सर्व जण परतले.

**– ॲन अश्विनी पारखी**

## अभिनंदन

- Interior Design work done by Rtn Mithil Bagal and his team was published in India's leading Interiors and architectural magazine.
- Rtn Badami Bhabhi Solanki received third prize in Hindi essay competition conducted during 39th District Inner wheel conference "Divya".
- Rtn Mukund Kamalakar and his team "Suryatech Solar Systems" won 1st IPL Installer Premium League by finishing the installation in record time of 55 minutes. One more feather in the cap for Suryatech.
- Rtn Vidyasagar Jadhav and Rtn Digambar Joshi completed Northeast Rotary Car rally, covering 4000 km. They travelled through altitudes from 0 to 14000 ft and temp ranging from 5 to 40 degrees, in most challenging hilly terrain.
- On 9 th March 24 PP Mukund Kamalakar was awarded certificate of Recognition at the hands of TRF Chair PRIP Barry Rassin on the occasion of Black Tie Dinner event for achieving status of MAJOR DONOR Level 1

## Rotary North East Car Rally

Rotary North East Car Rally साठी मी जाणार हे कळल्यावर मला ओळखणाऱ्या अनेकांनी अशा reactions दिल्या होत्या. आपल्या क्लबचे रो. बाळू जोशी व डिस्ट्रिक्टचे मिळून ६५ रोटेरीयन्स व ॲन्स, १६ गाड्या व सपोर्ट कार सहभागी होते.

सिलीगुडी, प. बंगाल येथून सुरू झालेली रॅली १७ दिवस ३५०० किमी ० ते १४००० फूट ऊंची, उणे ५ ते ४० अंश तापमान. काही ठिकाणी गुळगुळीत हायवे तर अत्यंत कठीण चढ उतार प्रचंड खड्डे व मोशन तुटली तर २००० फूट खोल दरी असे रस्ते. अशी आव्हाने पार करत चिन नेपाळ भूतान बांगलादेश व म्यनमार या इंटरनॅशनल बॉर्डर्स. बरोबर ७ राज्ये कव्हर करत सिलीगुडी येथे पूर्ण झाली.

रोज ऊत्तम ब्रेकफास्ट पंचतारांकित डिनर पण कधि तरी धाब्यावर ट्रक ड्रायव्हर शेजारी बसुन फक्त भात आमटी मिळाली. कधी डावकीला नदी पात्रात तंबू मधे राहीलो. तर गुवाहटीला रॅडिसन ब्लू या पंच तारांकित हॉटेल मधे. काय झाडी, काय डोंगार, काय हाटील, ओक्के मधे होत सगळं.

रॅली मधे फक्त गाडीच चालवावी लागते असे नव्हे. प्रचंड तणाव, प्रेझेंस ऑफ माईंड मोबाईल वर बोटे चालवून navigation करावे लागते, Google बाईनी चकवले तर तिचे बोट सोडून स्वतःचे डोके चालवावे लागते. मिट्ट काळोखात, आसपास चिटपाखरू नसताना, गाडी मागे घसरू लागली तर नुसता मनावर नव्हे तर गाडीच्या मागे सुध्दा दगड ठेवावा लागतो. Traffic jam च्या वेळी proactive होऊन काहींनी तो सोडवायला मदत केली हे कसं विसरता येईल? If you are not a part of the solution you are a part of the problem हे वाक्य त्या लेखकाला traffic jam मधेच सुचले असावे ह्याबद्दल खात्री पटली. हे सर्व एरवी कुठे शिकायला मिळणार?

'आमच्याकडे भेटायला कोणी येत नाही, तुम्ही आलात याचे फार अप्रूप वाटले' ही भावना अनेक ठिकाणच्या रोटरी क्लबच्या बोलण्यातून जाणवत होती. Karimganj, bongaigao, ही नावे नकाशावर पाहिली तेव्हा ती बांगला देशातली नव्हे, तर भारतातली आहेत हे कळले!

प्रदेशीक अभिमानाने जपलेली नृत्ये, वेशभूषा ह्यांनी आपल्या भारतातल्या वैविध्याची पुनः एकदा साक्ष दिली.

खड्ड्यांच्या आणि डोंगरांच्या बाबतीत महाराष्ट्राला मागे टाकेल असा प्रदेश. नेहमीपेक्षा वेगळ्या गाड्या, लपाछपी खेळणारे network पण त्या सर्वांकडे challenge म्हणून खूप काही शिकवून जातात. Organising team च्या चोख व्यवस्थेबद्दल त्यांना सलाम. पथनाट्य लिहिणे, बसवणे, आणि त्यात न विसरता संवाद म्हणणे ही जबाबदारी घ्यायला खूप मजा आली. आम्ही हे असे काही पहिल्यांदाच करत असलो तरी सर्वांच्या प्रोत्साहनामुळे लई भारी वाटले.

विनायक पेठे, केतकी व प्रदीप यांच्यासारख्या नाट्य क्षेत्रातील मंडळींनी हा आपला उपक्रम म्हणून त्यात लक्ष घातलं. Costume walk मधे चालण्याचा, Flash mob किंवा बाईपण मधे थिरकण्याचा आणि karaoke वर गाण्याचा अनेकांचा पहिला अनुभव असेल. सगळ्यांना सामावून घेत उत्तम presentation करणाऱ्या त्या त्या टीमचे खरेच कौतुक वाटते. बॅग्स पुन्हा पॅक करताना लक्षात आले.... अरेच्चा, आपण किती तरी अनावश्यक गोष्टी आणून सामान वाढवले होते की! शेवटी काय लागते रॅलीला? उत्तम नियोजन, काही रंगीबेरंगी T-shirts, रोटरी मधील मित्र मैत्रिणी आणि खूप खूप positivity.... बस्स!

**– पीपी विद्यासागर जाधव**


-: Bulletin Committee :-

Rtn Dr. Shubhada Jathar – Chairman | Ann Sujata Keskar – Member | Ann Seema Mhaskar – Member | Ann Aarti Dengre – Member | Rtn Rajeev Ghode – Member